# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०६ एप्रिल, २०१७ / चैत्र १६, १९३९ ( शके )**

**(१) वित्त आणि नियोजन, वने मंत्री**
**(२) ग्रामविकास, महिला व बाल कल्याण मंत्री**
**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**
**(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री**
**(५) जलसंधारण, राजशिष्टाचार मंत्री**
**(६) रोजगार हमी योजना, पर्यटन मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३७**

---

### श्री श्रेत्र खरपुडी खुर्द (ता.खेड, जि.पुणे) येथील ‘क’ वर्ग तीर्थस्थळांच्या विकास कामास निधी मिळण्याबाबत

**(१) * २८२४४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री श्रेत्र खरपुडी खुर्द (ता.खेड, जि.पुणे) येथील ‘क’ वर्ग तीर्थस्थळांची विकास कामे सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात मंजुर करुन निधी मिळणेबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री व मा.ग्रामविकास मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मौजे खरपुडी खुर्द (खंडोबाची) (ता.खेड, जि.पुणे) विठ्ठल रुक्मिणी मंदिर ते वाकी बु. मुंगीघाट रस्त्याचे काम जिल्हा परिषद स्तरावर ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्र योजनेतून प्रस्तावित केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) लोकप्रतिनिधीने खरपुडी खुर्द विठ्ठल रुक्मिणी मंदिर ते मुंगी घाट पर्यंतच्या रस्त्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांना दिनांक १७/०१/२०१७ रोजी निवेदन दिले असून निवेदनाची प्रत मा.मंत्री (ग्रामविकास) व मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांना पृष्ठांकीत करण्यात आली आहे.
(२) व (३) खरपुडी खुर्द ते वाकी बु. मुंगी घाट या रस्त्याचे काम “क” वर्ग तीर्थक्षेत्र योजनेतून करण्याबाबत जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), पुणे यांना प्रस्ताव सादर करण्यात आला. तथापि, सदर काम “क” वर्ग तीर्थक्षेत्र योजनेच्या निकषात बसत नसल्याने रस्त्याचे काम जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण या योजनेंतर्गत प्रस्तावित करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला मागासक्षेत्र अनुदान निधी परत गेल्याबाबत

**(२) * ३०७००  श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाकडून मागासक्षेत्र अनुदान योजनेंतर्गत (बीआरजीएफ) जलशुध्दीकरण सयंत्र व उभारणीसाठी ७ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध असून स्थानिक प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सदर निधीचा विनियोग व्यवस्थितरित्या न झाल्याने निधी परत जाणार असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून निधी प्राप्त होत नसल्याने कामांना गती मिळत नसल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येते, परंतु अधिकाऱ्यांच्या चुकीच्या नियोजनामुळे केंद्राकडून प्राप्त निधी परत जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निकर्ष काय आहेत, तसेच प्रस्तुत प्रकरणी संबंधित दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

गटविकास अधिकारी यांच्या मागणीनुसार रुपये ३०८.८४ लक्ष एवढी रक्कम २६८ ग्रामपंचायतीमध्ये ४१० जलशुध्दीकरण यंत्र बसविण्यासाठी ग्रामपंचायतीना वर्ग करण्यात आले आहेत.
(२) मागासक्षेत्र अनुदान निधी ही योजना केंद्र शासनाच्या दिनांक १२ मार्च, २०१५ रोजीच्या पत्रानुसार बंद करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

केंद्र शासनाने योजना बंद करून उर्वरित निधी केंद्र शासनास पाठविण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार कार्यवाही चालू आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निमगांव (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथे ग्रामीण रुग्णालयाचा बृहत आराखडा अंतिम करण्याबाबत

**(३) * २७७६० डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २३५१३ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निमगांव (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची मर्यादा, निमगांव परिसरातील गांवे व तेथील लोकसंख्येतील वाढ, प्राथमिक आरोग्य केंद्रातील कमी पडणाऱ्या उपलब्ध सोयी सुविधाचा विचार करता निमगांव येथे स्वतंत्र ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याची मागणी लोकप्रतिनिधी (नाशिक) यांनी दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निमगांव व परिसरातील ग्रामीण रुग्णालयाची निकड विचारात घेता, जोड बृहत आराखडा अंतिम करताना निकषानुसार सदर मागणी विचारात घेतली जाईल असे आश्वासन मा.सार्वजनिक आरोग्य आणि कुटूंबकल्याण मंत्री यांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निमगांव येथे स्वतंत्र ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

(२) होय.

(३) शासनस्तरावर सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत जोड बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. मौजे निमगांव (ता.मालेगाव, जि.नाशिक) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्याबाबतची मागणी जोड बृहत आराखडा अंतिम करताना निकषानुसार विचारात घेतली जाईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात जलयुक्त शिवार योजनेतील निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(४) * २९०८६ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: नागपूर जिल्ह्यासह सर्व ठिकाणी जलयुक्त शिवार योजनेच्या अंमलबजावणीतील अनास्थेमुळे नुकसान झालेले असून, या योजनेचे गतवर्षाचे रुपये २९३ कोटी माहे ऑगस्ट, २०१६ पर्यंत खर्च होऊ शकलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत आढावा घेण्यात आला आहे काय, त्यात काय आढळून आलेले आहे, सदर निधी पूर्णपणे खर्च करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सन २०१६-१७ या वर्षात उक्त योजनेखाली किती कामांसाठी विभागनिहाय किती निधी मंजूर करण्यात आलेला आहे व त्याच्या विनियोगाची सद्य:स्थिती काय आहे ?

**प्रा.राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

तथापि, जलयुक्त शिवार अभियानांतर्गत माहे जून, २०१६ अखेर रुपये १६७.४० कोटी निधी अखर्चित होता.

(२) शासनस्तरावरून जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ मधील शिल्लक निधी खर्च करण्यास दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१६-१७ मध्ये नाशिक विभागास रुपये २६०.२० कोटी, अमरावती विभाग रुपये २०५.३६ कोटी, पुणे विभाग रुपये २५६.९८ कोटी, औरंगाबाद विभाग रुपये ५७६.६१ कोटी, नागपूर विभाग रुपये ९३.३६ कोटी व कोकण विभाग रुपये ३५.२३ कोटी विशेष निधी वितरित करण्यात आला आहे.

सन २०१६-१७ मध्ये जलयुक्त शिवार अभियानांतर्गत दिनांक २४/३/२०१७ अखेर विशेष निधी रुपये २३४.५३ कोटी खर्च झाला असून २००१५ कामे हाती घेण्यात आली आहेत, त्यापैकी १३५८२ कामे पूर्ण झाली असून ६४३३ कामे प्रगतीपथावर आहेत.

-----------------

**वित्त विभागाच्या आदेशामुळे हिमोफिलीयावरील**
**औषधांची खरेदी प्रलंबित असल्याबाबत**

**(५) * २९८८५ श्री.रविंद्र फाटक, श्री.नारायण राणे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या आगामी अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर ५० हजार रुपयांपेक्षा अधिक किंमतीच्या वस्तूंची खरेदी न करण्याच्या वित्त विभागाच्या आदेशामुळे हिमोफिलीयावरील औषधांची खरेदी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयामुळे राज्यातील उपचार केंद्रात हिमोफिलीयाची इंजेक्शन उपलब्ध नसल्याने रुग्णांना खाजगी औषध दुकानातून औषधे विकत घ्यावी लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता दिनांक १७/०१/२०१७ तसेच त्यानंतर ५० हजार रुपयांपेक्षा अधिक किंमतीच्या कोणत्याही खरेदीच्या प्रस्तावांना मंजुरी देऊ नये, अशा सूचना वित्त विभागाच्या दिनांक १७/०१/२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. केंद्रीय योजना व त्यास अनुरुप राज्य हिस्सा तसेच बाहय सहायित प्रकल्पांसाठी वितरीत केलेल्या निधीमधून करावयाच्या खरेदीच्या प्रस्तावांना सदर निर्बंध लागू नाहीत.

हिमोफिलीया आजारावरील औषधांची खरेदी केंद्र शासनाने राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या निधीमधून करण्यात येते. सबब, सदर खरेदीसाठी दिनांक १७/०१/२०१७ च्या परिपत्रकामुळे निर्बंध नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बल्लारपूर, सिंदेवाही व कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यातील उपसा सिंचन योजना पूर्ण करण्याबाबत

**(६) * २७२८०  प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पळसगाव (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर), आमडी (ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर) व कोरपना तालुक्यातील उपसा सिंचन योजना पूर्ण होवूनही बंद असल्याचे दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सिंचन योजना बंद असल्याने परिसरातील शेतक-यांना पाणी उपलब्ध होत नसल्याने शेतीचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने निधीची तरतूद करुन सदर उपसा सिंचन योजना सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) पळसगाव आमडी उपसा सिंचन योजना ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर ही योजना बांधकामाधीन असून जून, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

आमडी, ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर अशी कोणतीही स्वतंत्र योजना अस्तित्वात नाही.

कोरपना तालुक्यातील भारोसा उपसा सिंचन योजना सन १९९२ पासून बंद असून सदर योजना जून, २०१७ पर्यंत उपलब्ध निधीतून कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

(३) सन २०१६-१७ मध्ये पळसगांव-आमडी उपसा सिंचन योजनेच्या बांधकामाकरिता रुपये १२५६.३९ लक्ष व भारोसा उपसा सिंचन योजनेच्या विशेष दुरुस्तीसाठी रुपये १०६.७६ लक्ष निधी शिल्लक आहे.

तसेच सन २०१७-१८ मध्ये पळसगांव-आमडी उपसा सिंचन योजनेकरिता प्रस्तावित तरतुद रुपये १४०० लक्ष आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाचंग्री (ता.पाटोदा, जि.बीड) येथील अंगणवाडीत पर्यवेक्षिका पदावर बनावट कागदपत्राच्या आधारे नियुक्ती केल्याबाबत

**(७) * ३०७६०  श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचंग्री (ता.पाटोदा, जि.बीड) येथील अंगणवाडी पर्यवेक्षिका या पदासाठी खोटी कागदपत्रे सादर करून नोकरी मिळवली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बोगस नियुक्तीबाबत जिल्हाधिकारी, बीड व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार करून चौकशीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) होय, चौकशी केली आहे. चौकशीअंती सदर तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले नाही. त्यामुळे कोणावरही कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही तसेच चौकशीअंती तक्रारदार यांनी आपल्या शंकेचे निरसन झाल्याचे व तक्रार मागे घेतल्याचे लेखी कळविले आहे.

-----------------

## वाडा व मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील रोजगार हमी योजनेसाठी आवश्यक जॉबकार्ड मिळण्याबाबत

**(८) * २९३२८ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यात कुपोषणामुळे बळी पडलेल्या रोशनी सवराच्या वडिलांना तालुक्यात रोजगार हमीचे काम सुरु नसल्यामुळे आणि नोटाबंदीमुळे आलेल्या मंदीमुळे बांधकाम क्षेत्रातही काम मिळत नसल्याचे दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोखाडा तालुक्यामध्ये बहुतांशी लोकांना रोजगार हमी योजनेसाठी आवश्यक असलेले जॉबकार्ड मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वाडा तालुक्यात ऐनशेत ग्रामपंचायतीत सन २०१६-१७ मध्ये आजतागायत रुपये ४.७९ लक्ष इतक्या रकमेची अकुशल कामे व रुपये ३.९१ लक्ष रकमेची कुशल कामे अशी एकूण रुपये ८.७० लक्ष इतक्या रकमेची कामे झालेली आहेत. तसेच सदर ग्रामपंचायत क्षेत्रात पुढेही कामे चालू आहेत.

कु.रोशनी गुरुनाथ सवरा, रा.ऐनशेत, ता.वाडा यांच्या कुटुंबांतील सदस्यांना जॉबकार्ड देण्यात आलेले आहे. त्यांनी मनरेगा अंतर्गत कामाची मागणी केलेली नाही. मजूरांनी कामाची मागणी करुन देखील काम उपलब्ध करुन देण्यात आले नाही, अशी बाब उद्भवलेली नाही.

(२) हे खरे नाही.

मोखाडा तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत एकूण २४,३७४ इतकी जॉबकार्ड वाटप झाली आहेत. तसेच नोंदणी केलेल्या मजूरांना मागणीनुसार काम देण्यात येते. त्याचप्रमाणे सन २०१५-१६ यावर्षी ५८५७ इतक्या जॉबकार्डधारक कुटुंबांनी कामांसाठी मागणी केली होती. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात यंत्रणा व ग्रामपंचायत विभाग यांच्याकडील कामावरील २,७७,५२४ इतकी मनुष्य दिन निर्मिती झाली आहे. तसेच सन

२०१६-१७ या आर्थिक वर्षात ७८२१ इतक्या जॉबकार्डधारक कुटुंबानी कामांसाठी मागणी केली आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात यंत्रणा व ग्रामपंचायत विभाग यांच्याकडील कामावरील २,८६,४८० इतकी मनुष्य दिन निर्मिती झाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**"मागेल त्याला शेततळे" योजनेंतर्गत शेततळींची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(९) * ३०६१८ श्री.नारायण राणे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सुरु केलेल्या (मागेल त्याला शेततळे) या योजनेंतर्गत ५५,७१४ शेततळयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी ९,६०६ शेततळ्यांची कामे पूर्ण झाल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त अपूर्णावस्थेतील शेततळयांची कामे पूर्ण होत नसल्याने शेतक-यांची पाण्याअभावी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच “मागेल त्याला शेततळे” या योजनेनुसार राज्यात १,११,१११ शेततळी उभी करायची आहेत, मात्र दोनदा मुदतवाढ देऊनही काम पूर्ण झालेले नसल्याने रोजगार हमी योजना विभागाने ५० पैशांची पैसेवारीची अट काढली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेततळीची कामे पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच आतापर्यंत किती शेततळयांचे उद्दिष्ट गाठण्यात आले आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) नाही. शेततळे मुख्यत्वे भुजल पुनर्भरणासाठी असून पावसाळयात भू-पृष्ठावरून वाहून जाणारे पावसाचे पाणी काही कालावधीसाठी अडविणे व जमिनीत मुरविणे यासाठी घेतली जातात.

(३) नाही. शेततळे योजनेचा लाभ सर्व इच्छुक व गरजू शेतकऱ्यांना घेता यावा या उद्देशाने दिनांक १० ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये ५० पैसे आणेवारीची अट शिथिल करून सदर योजना राज्यातील सर्व जिल्हयात राबविण्यात येत आहे.

(४) शेततळयांची कामे अधिक गतीने व्हावीत यासाठी शेततळे खोदकाम करणाऱ्या मशिनधारकास इंधन खर्चासाठी आगाऊ रक्कम म्हणून काम सुरु करण्यापुर्वी अनुज्ञेय अनुदानाच्या २० टक्के रक्कम लाभार्थीच्या खात्यावर जमा करण्याबाबतच्या तसेच मशिनधारकास केलेल्या कामाचा मोबदला मिळण्याची हमी व्हावी म्हणून मशिनधारक, लाभार्थी व कृषी विभागाचे प्रतिनिधी यांचेमध्ये १०० रुपयाच्या स्टँप पेपरवर करार करण्याच्या सूचना क्षेत्रियस्तरावर देण्यात आल्या आहेत. शासनस्तरावरून शेततळ्यांच्या कामाचा आढावा घेण्यात येत आहे. सध्य:स्थितीत "मागेल त्याला शेततळे" या योजनेंतर्गत ७१,३९५ शेततळ्यांच्या कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आला असून १६,०९४ इतकी कामे पूर्ण झाली आहेत. तसेच ६,२३४ इतकी कामे सुरू आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्हयातील लघुसिंचन प्रकल्पाच्या कामासाठी**
**प्रशासकीय मंजूरी व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१०) * ३०७१७ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई पाहता तेथील निधी अभावी व प्रशासकीय मंजुरी निविदा प्रक्रियेमुळे प्रलंबित असलेले लघुसिंचन प्रकल्पाचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी मा.जलसंधारण राज्यमंत्री यांचेकडे मागणी करुनही या प्रकरणी कार्यवाही झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लघुसिंचन प्रकल्पाच्या कामासाठी प्रशासकीय मंजूरी व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

श्री.राजन साळवी, विधानसभा सदस्य यांनी राज्यमंत्री (जलसंधारण) महोदयांकडे दिनांक १८/१२/२०१५ रोजी निवेदन दिलेले होते. यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील निविदा प्रक्रियेमुळे प्रलंबित असलेले ११ प्रकल्पांची कामे हाती घेणेबाबत व प्रगतीपथावरील ६ प्रकल्पास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी करण्यात आली होती.

(२) रत्नागिरी जिल्ह्यातील उपरोक्त १७ प्रकल्पांपैकी ७ प्रकल्पास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त नसल्यामुळे या योजनांची प्रशासकीय मान्यता महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचे दिनांक १४/१०/२०१४ चे आदेशान्वये रद्द करण्यात आली. तसेच महामंडळाचे संचालक मंडळाच्या दिनांक २४/०९/२०१५ रोजी संपन्न झालेल्या ४९ व्या बैठकीतील विषय क्र.०४ वरील पारित ठरावास अनुसरुन ४ योजनांची प्रशासकीय मान्यता महामंडळ निर्णय दिनांक १८/०३/२०१६ अन्वये रद्द करण्यात आली. उर्वरित ६ योजनांपैकी ५ योजनांना माहे जून, २०१६ मध्ये रुपये १२.३५ कोटी निधी प्राप्त झालेला असून तो निधी खर्च करण्यात आलेला आहे.

निधीच्या उपलब्धतेनुसार महामंडळामार्फत प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आलेल्या योजनांचे अंदाजपत्रक नवीन दरसूचीनुसार अद्ययावत करुन या योजनांची आवश्यकता तपासून यामध्ये पाणी उपलब्धता, लोकप्रतिनिधींची मागणी, टंचाई परिस्थिती, अवर्षन-प्रवन क्षेत्र इत्यादी बाबी तपासून मा.राज्यपालांचे सूत्रानुसार नव्याने प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्याबाबत महामंडळाचे दिनांक २६/०८/२०१६ च्या पत्रान्वये क्षेत्रियस्तरावर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यातील पाटपाण्या खालील सिंचन क्षेत्र वाढविण्याबाबत

**(११) * ३०७८२ डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यात पाटपाण्या खालील सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी जलसंपदा विभागाने जलाशय, नदी अशा कालवा लाभक्षेत्रातील विहिरीच्या सिंचन क्षेत्राचाही समावेश करण्याचा निर्णय घेतल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाटपाण्याचा अप्रत्यक्ष लाभ मिळणाऱ्या शेतकऱ्यांना आपल्या विहिरीवर फुलविलेल्या शेती पिकाच्या पाणी वापराचे हमीपत्र दयावे लागण्याच्या निर्णयामुळे शेतीवरही जाचक बंधने येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील सर्व स्त्रोतातून सिंचीत क्षेत्राचा तपशील एकत्रित करण्यासाठी कालव्याच्या लाभक्षेत्रात कालव्याव्दारे, नदीवरील उपसा व विहिरीवरील सिंचीत क्षेत्राचे मूल्यांकनासाठी शासन परिपत्रक क्रमांक २०१६/(५९१/१६)/सिंव्य(धो), दिनांक २२/११/२०१६ अन्वये निर्देश देण्यात आलेले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ‘पार-तापी-नर्मदा’ नदीजोड प्रकल्पा ऐवजी ‘नार-पार-गिरणा-गोदावरी’ लिंक या प्रकल्पाचा अहवाल तयार करण्याबाबत

**(१२) * २७४१३ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ‘पार-तापी-नर्मदा’ नदीजोड प्रकल्पा ऐवजी ‘नार-पार-गिरणा-गोदावरी’ लिंक या प्रकल्पाचा राष्ट्रीय जलविकास अभिकरणामार्फत सुधारीत अभ्यास करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे प्रयत्न करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

अशी मागणी माहे जुलै, २०१६ मध्ये मुख्य अभियंता, जलविज्ञान, नाशिक यांचेकडे झाली होती.

(२) नार, पार, औरंगा, अंबिका या पश्चिम वाहिनी नदयांचे पाणी गिरणा खो-यात वळविणेबाबतच्या योजनेच्या सर्वेक्षण व अन्वेषणाच्या रूपये ३.६३ कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकास शासनाने दिनांक २३ डिसेंबर, २०१४ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. योजनेच्या सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शिळ (ता.विक्रमगड, जि.पालघर) येथील शासकीय गायरान जमिनीवर भूमाफियांनी अतिक्रमण केल्याबाबत**

**(१३) * २८९२९ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिळ (ता.विक्रमगड, जि.पालघर) येथील गट क्र. २४९ या शासकीय गायरान जमिनीवर स्थानिक भूमाफियांनी शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने जमिनीवर कब्जा करुन अनधिकृतपणे बांधकाम केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मौजे शिळ मध्ये गट नं. २४९ असा गट नं. अस्तित्वात नाही. तथापि, मौजे शिळ गट नं. २४१ मध्ये १० गुंठे क्षेत्रावर श्री.चिंतामण गोपाळ गहला, रा.देहर्जे, ता.विक्रमगड, जि.पालघर यांनी शेतीसाठी अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सदर अतिक्रमणाबाबत वनपाल, विक्रमगड यांनी राऊंड गुन्हा क्रमांक ई.११/सन २०१६-१७, दिनांक ३/०३/२०१७ अन्वये गुन्हा नोंदविला असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मस्करवाडी (ता.माण, जि.सातारा) आणि जाशी येथील हुतात्मांच्या स्मरणार्थ कमान उभारण्याबाबत

**(१४) * ३०४६० श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मस्करवाडी (ता.माण, जि.सातारा) येथील हुतात्मा जवान सुनिल सुर्यवंशी आणि जाशी येथील जवान चंद्रकांत गंलाडे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या गावी कमान उभारण्याचा निर्णय ग्रामपंचायतीने ग्रामस्थांच्या सूचनेनुसार ग्रामसभेत ठराव घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ग्रामसभेच्या ठरावाची प्रत व मागणीपत्र दिनांक १६ जून, २०१६ रोजी मा.पालकमंत्री व सहकार मंत्री यांना दिले असतानाही शासनाने संबंधित कमानीविषयी दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन निधी उपलब्ध करुन देवून हुतात्मा जवानांच्या गावात त्यांच्या स्मरणार्थ कमानी उभारण्यासोबत सदर जवानांच्या पत्नींना शासन सेवेत समावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही. हे खरे नाही.

(२) नाही. या विभागाकडे कोणतेही निवेदन अद्याप प्राप्त झाले नाही.

(३) हुतात्मा जवानांच्या स्मरणार्थ कमानी उभारण्याबाबतचा प्रस्ताव विभागाकडे प्राप्त झालेला नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.आरटीए-१०८२/३५०२/सीआर-१००/१६अ, दिनांक ०२ सप्टेंबर, १९८३ अन्वये, सैनिकी सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला त्यांच्या पसंती क्रमाने वर्ग-३ व वर्ग-४ मधील १५ टक्के आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदावर नियुक्तीची तरतुद आहे. त्यानुसार हुतात्मा जवानांच्या वारसांना शासन नियुक्त केले जाते. त्यानुसार हुतात्मा जवान श्री.सुर्यवंशी यांच्या पत्नीच्या नावाची नोंदणी जिल्हा सैनिक मंडळ कार्यालय, सातारा येथे करण्यात आली आहे. तथापि, शहीद जवान श्री.गलांडे यांच्या पत्नीने मुले लहान असल्याने सद्य:स्थितीत नोकरीसाठी असमर्थता दर्शविली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून पर्यटनाला चालना मिळण्यासाठी मुंबईतील प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत

**(१५) * ३०७६७ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून मुंबईच्या पर्यटनाला चालना मिळण्यासाठी तीन प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या निर्णयाला वर्ष होऊनही पायाभुत सुविधा उपलब्ध नाहीत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, हॅलिकॉप्टरमधून मुंबई दर्शन, सी-प्लॅन आणि समुद्रात पंचतारांकित हॉटेल असे प्रकल्प जागेअभावी सुरु झालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील पर्यटनाला पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हेलिटुरिझम, सी-प्लेन सेवा व फ्लोटेल हे प्रकल्प खाजगी आहेत. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ सुविधा पुरविण्याची (फॅसिलिटेटर) म्हणून भूमिका करते. यापैकी हेलिटुरिझम प्रकल्पासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(२), (३) व (४) वरील उर्वरित दोन प्रकल्प राबविण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून संबंधित यंत्रणांकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. जागा व आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पकर्ते सदर प्रकल्प कार्यान्वित करतील.

याशिवाय मुंबई दर्शन सेवा बी.ई.एस.टी. (बेस्ट) च्या सहयोगाने सुरु करण्यात आली आहे. मुंबई पोर्ट ट्रस्टच्या क्रुझ टुरिझमला सुविधा उपलब्ध करुन दिल्या असून सदर प्रकल्प सुरु झाला आहे. एलिफंटा लेण्या असलेल्या बेटांवर पर्यटक सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या आराखडयास नुकतीच मंजुरी देण्यात आली आहे.

-----------------

**गोसीखुर्द प्रकल्पाची कामे पूर्ण करण्याबाबत**

**(१६) * २७१९८ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील महत्वाकांक्षी गोसीखुर्द प्रकल्पाची सुधारीत प्रशासकीय किंमत रुपये १८ हजार ४९५ कोटी असून आतापर्यंत रुपये ९ हजार ५०० कोटींची कामे झालेली आहेत व प्रकल्प झाल्यानंतर २ लाख ५० हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे व कामास गती मिळावी यासाठी सदर प्रकल्पाची रुपये एक हजार कोटीची कामे केंद्र शासनाच्या नॅशनल बिल्डिंग कॉर्पोरेशनला (एनबीसीसी) देण्याबाबतचा निर्णय दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच उक्त प्रकल्पाच्या कामांची सद्यस्थिती काय आहे व उर्वरित कामे किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पाच्या प्रथम प्राधान्याच्या प्रकल्प घटकापैकी सुमारे रुपये १०५८ कोटी अंदाजित किंमतीची कामे सामंजस्य कराराचे माध्यमातून केंद्र शासनाचे नगरविकास खात्याचे अधिपत्याखालील नॅशनल बिल्डिंग कंस्ट्रक्शन कॉर्पोरेशन (एन.बी.सी.सी.) (इंडिया) लिमिटेड या पब्लिक वर्क ऑर्गनाझेशन (PWO) या कंपनीस पहिल्या टप्यात देण्याबाबत मा.मंत्रीमंडळाने दिनांक १५/१२/२०१६ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार दिनांक ५/१/२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.

त्यानुषंगाने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर व नॅशनल बिल्डिंग कंस्ट्रक्शन कॉर्पोरेशन (एन.बी.सी.सी.) (इंडिया) लिमिटेड यांच्यादरम्यान दिनांक १६/३/२०१७ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

सदर करारानुसार एन.बी.सी.सी. व्यवस्थापन कंपनी (PMC) या नात्याने त्यांच्यावर प्रकल्प नियोजन, प्रकल्पाच्या घटकांची संकल्पचित्रे तयार करणे, प्रकल्प घटकांची अंदाजपत्रके तयार करणे, निविदा कागदपत्रे तयार करुन व निविदा प्रक्रीया राबवून एजन्सी निश्चित करणे, प्रत्यक्ष कामकाज एजन्सीकडून करुन घेणे, प्रकल्पाच्या कामाची अंमलबजावणी, कंत्राट व्यवस्थापने, पर्यवेक्षण,

कामाचे गुण नियंत्रण, संनियंत्रण, देयके तयार करुन अदायगी करणे, झालेल्या कामामध्ये त्रुटी राहिल्यास त्याची तपासणी करुन दुरुस्ती विहित वेळेत व कंत्राटदाराच्या खर्चाने करुन घेणे. अशा सर्व कामांची जबाबदारी कंपनीवर असेल. एनबीसीसी राज्य शासनाच्या खरेदी धोरणानुसार (Procurement Policy) पारदर्शकपणे निविदेद्वारे कंत्राटदार निवडीची प्रक्रिया राबवेल. शासनाचे प्रचलित करारातील तरतुदीनुसार दोष दुरुस्ती जबाबदारी (Defect liability) ही एनबीसीसी यांचेवर असेल.

(३) धरणाचे काम पुर्ण झाले आहे. मात्र पुर्नवसनाअभावी धरणात ५४.१ टक्के पाणीसाठा करणेत येतो. प्रकल्पीय सिंचन क्षमता २,५०,८०० हेक्टर असून यापैकी ३९,९७० हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. उर्वरित प्रकल्पाची कामे डिसेंबर, २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

-----------------

**शिर्शी (ता.सोनपेठ, जि.परभणी) कालव्यामधील चाऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१७) * २७५०१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्शी (ता.सोनपेठ, जि.परभणी) कालवामधील चाऱ्यांची दुरुस्ती व निगा राखण्यासाठी कोटयवधी रूपयांचा खर्च करूनही शेवटपर्यंत पाणी मिळत नसल्याने याची चौकशी करण्याची मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रधान सचिव, जलसंपदा यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोटयवधीचा निधी खर्च करून मुख्य व लगतच्या लहान चाऱ्यांच्या दुरूस्त्या, गाळ काढणे इ. कामे न करता गैरप्रकार करणाऱ्या अधिकारी, कंत्राटदार, यंत्रणांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच शिर्शी कालव्याची दुरुस्ती व निगा राखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

तथापि, परभणी येथील श्री.सिध्दश्वेर केशरबुवा गिरी यांनी शिर्शी कालव्यासंदर्भात प्रधान सचिव, जलसंपदा यांच्याकडे याच तारांकित प्रश्नाचा संदर्भ देऊन दिनांक १८/०२/२०१७ रोजी निवेदन दिले आहे.

(२) या निवेदनातील तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक यांचेस्तरावरुन चौकशी करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) आवश्यकतेनुसार शिर्शी कालव्याची दुरुस्ती करण्यात येत आहे. पाणी वापर संस्थेस हस्तांतरीत केलेल्या लाभक्षेत्राची दुरुस्ती पाणी वापर संस्थेने करणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चुनाभट्टी (मुंबई) येथील एका दांम्पत्याने बेकायदेशीररित्या दत्तक घेतलेल्या मुलाचा छळ केल्याबाबत**

**(१८) * २९०१७ श्रीमती स्मिता वाघ, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चुनाभट्टी (मुंबई) येथील एका दांम्पत्याने बेकायदेशीररित्या दत्तक घेतलेल्या मुलाचा छळ केल्याप्रकरणाची गंभीर नोंद महिला व बाल कल्याण समितीने घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी पोलिसांना गुन्हा दाखल करण्याचे आदेश महिला व बाल कल्याण समितीने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गुन्हा दाखल करण्यात आला आहे, त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी चुनाभट्टी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामे प्रलंबित असल्याबाबत

**(१९) * २८०५४ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात ४ वर्षापासून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची १४०३० कामे गेल्या ५ वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामांच्या दर्जाबाबत अनेक तक्रारी असल्याने सदर कामाची पहाणी करण्यासाठी केंद्रीय पथक जालन्यात येणार होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पथक जालनात न येता औरंगाबाद येथूनच परत गेले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कामे वेळेत पूर्ण न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जालना जिल्हात एकूण ३४४७९ कामे हाती घेण्यात आली होती त्यापैकी २०३७७ कामे पूर्ण झालेली आहेत व १४१०२ कामे अपूर्ण आहेत. सन २०१३-१४ मध्ये त्यापूर्वीची ७०२० कामे अपूर्ण आहेत यामध्ये शौचालय, विहीर पुर्नभरण, सिंचन विहीरीची कामे आहेत. त्यांची कुशल देयक देणे प्रलंबित आहे. सन २०१४-१५ मध्ये १८२२, सन २०१५-१६ मध्ये २०३५, व सन २०१६-१७ मधील ३२२५ असे एकूण ७०८२ कामे प्रगतीपथावर आहेत. वित्तीय वर्ष २०१४-१५ व त्यापूर्वीच्या अपूर्ण कामांना त्यावेळी ग्रामपंचायत स्तरावर ६०:४० चे प्रमाण असल्यामुळे कुशल निधी वितरीत करता आलेला नाही. तथापि आता कुशल प्रमाणकाच्या प्राधान्यक्रमानुसार कुशल देयके अदा करण्याच्या सुचना जिल्हास्तरावरुन देण्यात आलेले आहेत. केंद्रीय पथक हे दिनांक ५/१/२०१७ रोजी जिल्हातील कामांना भेट देणार होते. परंतू ते तक्रारीच्या अनुंषगाने नसून मग्रारोहयो अंतर्गत केलेल्या कामाबाबत व अभिलेख्यांची पहाणी करण्यासाठी येणार होते. तथापि सदर पथकाचा दौरा काही कारणास्तव रद्द झाल्या कारणाने ते पथक महाराष्ट्र राज्यात आले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खुडेद ग्रामपंचायत (ता.विक्रमगड, जि.पालघर) रोजगार हमी योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२०) * २८३२२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुडेद ग्रामपंचायत (ता.विक्रमगड, जि.पालघर) रोजगार हमी योजनेच्या हजेरीपटावर मृत लोकांची नांवे घालून पैसे हडप करुन, काम न करता कागदोपत्री रस्ते दाखवून त्याच्या रक्कमेत दोन ग्रामसेवकांनी गैरव्यवहार केल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित ग्रामसेवकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.

(२) संबंधित दोन्ही ग्रामसेवक यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पैनगंगा व उर्ध्व पैनगंगा नदीवर बंधारे उभारण्याबाबत**

**(२१) * २८६८९ श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, श्री.आनंद ठाकूर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैनगंगा व उर्ध्व पैनगंगा नदीवर ठिकठिकाणी बंधारे उभारावे आणि कॅनॉल व पैनगंगा नदीपात्रात इसापूर धरणाचे पाणी सोडावे अशी मागणी विदर्भ-मराठवाडयातील हजारो शेतकऱ्यांनी तसेच लोकप्रतिनिधींनी शासनाकडे ५ वर्षापासून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणाचे पाणी न सोडल्यामुळे पाणीटंचाई निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पैनगंगा व उर्ध्व पैनगंगा नदीवर बंधारे बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, अशा आशयाची मागणी अंतर्भूत असलेली निवेदने प्राप्त झाली आहेत हे खरे आहे.

(२) नाही, उर्ध्व पैनगंगा प्रकल्पांतर्गत इसापूर, ता.पुसद, जि.यवतमाळ येथे इसापूर धरण असून प्रकल्प लाभक्षेत्रात रब्बी हंगामात सिंचनासाठी पाण्याची आवर्तने देण्यात आली आहेत.

(३) उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाची बांधकामे व पैनगंगा नदीवर प्रस्तावित सहस्त्रकुंड बहुउद्देशीय जलविद्युत प्रकल्पाचे खालील बाजूस पाच उच्च पातळी बंधा-याची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात औषध महामंडळ स्थापन करण्याबाबत

**(२२) * २७७६१ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २४३८९ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी टाटा ट्रस्ट यांच्यासमवेत दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर करारातील तरतुदीनुसार वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या खरेदी/वितरण धोरणाचा अभ्यास करून महाराष्ट्र स्टेट मेडिकल सप्लाय कॉर्पोरेशन स्थापन करण्याच्या दृष्टीने टाटा ट्रस्ट यांनी दिनांक १५ जून, २०१६ रोजी शासनास अंतरीम अहवाल (Draft Report) सादर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र स्टेट मेडिकल सप्लाय कॉर्पोरेशन स्थापन करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) राज्यातील आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी टाटा ट्रस्ट यांच्यासमवेत करण्यात आलेल्या सामंजस्य करारानुसार टाटा ट्रस्ट यांनी महाराष्ट्र स्टेट मेडिकल सप्लाय कार्पोरेशन स्थापन करण्याच्यादृष्टीने अंतरिम अहवाल (Draft Report) शासनास सादर केला असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही विचाराधीन आहे.

-----------------

**जिल्हा सामान्य रुग्णालय (जि.भंडारा) येथील डॉक्टर व चिकित्सक यांच्या मनमानी कारभारामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(२३) * २९११५ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा सामान्य रुग्णालय (जि.भंडारा) येथील डॉक्टर व चिकित्सक यांच्या मनमानी कारभारामुळे आबाल-वृध्दांची गैरसोय होत असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांकडे होत असलेल्या दुर्लक्षामुळे डॉक्टर त्यांच्या खाजगी रुग्णालयात सेवा बजावतात अशी रुग्णांची समजूत झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विंलबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धुळे, गडचिरोली, चंद्रपूर व नंदुरबार या जिल्हयात स्त्री रूग्णालय नव्याने मंजूर करण्याबाबत**

**(२४) * २७२९२ प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक १९५५७ ला दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे, गडचिरोली, चंद्रपूर व नंदुरबार या जिल्हयात १०० खाटांचे स्त्री रूग्णालय नव्याने मंजूर करण्यात येत असल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १७ जानेवारी, २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात मंजुर १५ स्त्री रुग्णालयांपैकी उर्वरित ७ स्त्री रुग्णालयांसाठी जागेचे संपादन करण्यात आले असून १०० खाटांचे स्वतंत्र महिला व नवजात शिशू रुग्णालयाचे बांधकाम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, महिला रुग्णालय धुळे येथे आकृतीबंधानुसार पद निर्मितीबाबतचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेसाठी सादर करुन त्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर स्त्री रूग्णालये सुरु करुन त्यासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

शासन निर्णय दिनांक १७/०१/२०१३ अन्वये धुळे, शासन निर्णय दिनांक ०३/०२/२०१० अन्वये गडचिरोली व चंद्रपूर व शासन निर्णय दिनांक २५/०८/२००९ अन्वये नंदुरबार येथे स्त्री रुग्णालये मंजुर करण्यात आली आहेत.

(२) हे अशंतः खरे आहे.

शासन निर्णय दिनांक १७/०१/२०१३ अन्वये १५ ठिकाणी स्त्री रुग्णालय मंजुर करण्यात आले आहे. त्यापैकी १० ठिकाणी जागा प्राप्त झाली असून ५ ठिकाणी जागा प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) होय.

शासन निर्णय दिनांक ०२/०१/२०१७ अन्वये स्त्री रुग्णालय धुळे, गडचिरोली, चंद्रपूर व नंदुरबार येथे पदनिर्मिती करण्यास मान्यता दिली आहे.

(४) सहा स्त्री रुग्णालयासाठी निधी उपलब्ध करुन दिला असून उर्वरीत ठिकाणी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खर्डी (ता.शहापुर, जि.ठाणे) येथील दळखण परिसरातील आदिवासी समाजाच्या विटभट्टी कामगारांची घरे तोडल्याबाबत

**(२५) * ३०४३१ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खर्डी (ता.शहापुर, जि.ठाणे) येथील दळखण परिसरात १५ ते २० वर्षापासून राहत असलेल्या वारली आदिवासी समाजाच्या विटभट्टी कामगारांची घरे वनखात्याने दिनांक ६ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास तोडून टाकली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

तथापि, शहापूर वन विभागातील खर्डी वन परिक्षेत्रातील मौजे दळखण येथील संरक्षित वन गट नंबर २२७ समाविष्ट सर्व्हे क्र. ९७ मध्ये नुकतेच अतिक्रमण असलेल्या बेवारस ८ झोपडया दिनांक ७/२/२०१७ रोजी वनक्षेत्रपाल, खर्डी यांनी पोलीस बंदोबस्तात निष्कासित केल्या आहेत.
(२) प्रकरणी वनक्षेत्रपाल, खर्डी यांनी सविस्तर चौकशी करुन सदर अतिक्रमण नव्याने सुरु असल्याबाबत खात्री करुन सदर बेवारस अतिक्रमण निष्कासनाची कार्यवाही केलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अकोले व संगमनेर (जि.अहमदनगर) भागात**
**वन्यप्राण्यांच्या मृत्यूला आळा घालण्याबाबत**

**(२६) * २७४१५ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोले व संगमनेर (जि.अहमदनगर) या भागात २१ हून अधिक बिबट्यांचा मृत्यू झाल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार वन्यप्राण्यांच्या मृत्यूला आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) अहमदनगर जिल्ह्यातील अकोले व संगमनेर या तालुक्यात माहे जानेवारी, २०१६ ते डिसेंबर, २०१६ या कालावधीत नैसर्गिकरित्या-७, विहिरीत पडून-५, अपघाताने-५ व आपसातील झुंजीत-५ असे एकूण २२ बिबट्यांचा मृत्यू झाला आहे.

वन्यप्राण्यांचे होणारे मृत्यू रोखण्याच्यादृष्टीने क्षेत्रियस्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वन्यप्राण्यांचे रस्ता अपघातात मृत्यू होऊ नये म्हणुन रस्त्याचे बाजुला, महत्वाच्या वळणावर सावधानतेचे फलक लावणेत आलेले आहे.
- बिबट प्रवण क्षेत्रातील गावात घडीपत्रिका वाटप करून सार्वजनिक ठिकाणी पोस्टर्स लावण्यात आले आहेत.
- महसूल विभाग स्तरावर अपर विशेष पोलीस महानिरीक्षक व जिल्हा स्तरावर पोलीस अधिक्षक हे अध्यक्ष असलेले व्याघ्र कक्षांची निर्मिती करण्यात आली असून त्यामध्ये वन/वन्यजीव विभाग, विद्युत विभाग, रेल्वे पोलीस इत्यादी सदस्य आहेत.
- व्याघ्र कक्षाच्या सभेमध्ये व्याघ्र संरक्षणाबाबत समन्वयाने कार्यवाही करण्यात येत असते.
- जंगलामध्ये आवश्यक त्याठिकाणी निरीक्षण मनोरे उभारण्यात आले आहेत.
- वन्यप्राण्यांच्या हालचालींचे संनियंत्रण ठेवण्याकरीता कॅमेरा ट्रॅप, जीपीएसचा वापर केला जातो.
- संरक्षित क्षेत्रातील नैसर्गिक पाणवठे, कृत्रिम पाणवठ्याची वनकर्मचाऱ्यामार्फत नियमित तपासणी करण्यात येते.
- शिकाऱ्याबाबत गोपनियरित्या माहिती संकलित करण्यात येते.
- संगमनेर उपवन विभागात २ रेस्क्यु पथके निर्माण करण्यात आलेले असून पथकातील कर्मचा-यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.
- सदर पथकातील सदस्यांना वन्यप्राण्यास बेशुध्द करण्याकरिता विशेष ट्रॅन्क्युलायझिंग गन तसेच वन्यप्राण्यांची ओळख पटविण्याकरिता कॅमेरा ट्रप इत्यादी साहित्य उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.
- ऊस शेतीमध्ये अधिवास करणाऱ्या बिबट्यांबाबत जनजागृती अभियान राबविण्यात आले आहे.
- वनक्षेत्रावर विविध योजनेतून उपलब्ध अनुदानातून वनतळे / वनबंधारे / सिमेंट बंधारे/पाणवठे इत्यादी कामे करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पतंगशाह कुटीर रुग्णालय (ता.जव्हार, जि.पालघर) २०० खाटांचे करण्याबाबत**

**(२७) * ३०८६५ श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक २५३१६ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पतंगशाह कुटीर रुग्णालयात (ता.जव्हार, जि.पालघर) तीन-चार तालुक्यातून उपचारासाठी रुग्ण येत असल्यामुळे, सदर रुग्णालय २०० खाटांचे करण्यात यावे अशी मागणी स्थानिक नागरिकांनी माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालय २०० खाटांचे करण्याबाबतच्या अंदाजपत्रकाला व आराखड्याला मान्यता देण्यात न आल्याने उक्त रुग्णालयाचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुग्णालयाच्या कामास मान्यता देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

(२), (३) व (४) सदर रुग्णालयाच्या २०० खाटांच्या श्रेणीवर्धनास शासन मान्यता देण्यात आली आहे. तसेच अंदाजपत्रक व आराखडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

----------------

**परभणी जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या प्रलंबित लेखा परिक्षणाबाबत**

**(२८) * २७६३५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील सुमारे ६०० हून अधिक ग्रामपंचायतींनी विहित मुदतीत लेखा परिक्षण केलेले नसल्याने उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी संबंधितांना दोन वेळेस नोटीसा जारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन विहित मुदतीत लेखा परिक्षण करून न घेणाऱ्या संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांच्यावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) परभणी जिल्ह्यातील सन २००७-०८ ते २०१३-१४ या कालावधीतील ४४१ ग्रामपंचायतीचे लेखापरिक्षण प्रलंबित असल्याचे जून, २०१५ मध्ये निदर्शनास आले होते.

संबंधित ग्रामसेवकांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून ग्रामपंचायतीचे अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करुन न दिल्याच्या कारणास्तव जिल्हा परिषद परभणी अंतर्गत १० ग्रामसेवकांना जिल्हा परिषदेच्या सेवेतून निलंबित करण्यात आले होते.

प्रलंबित ४४१ ग्रामपंचायतीपैकी २७६ ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण पूर्ण करून घेण्यात आले आहे. सद्यस्थितीत डिसेंबर, २०१६ अखेर सन २००७-०८ ते २०१४-१५ या कालावधीतील १६५ ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण होणे बाकी आहे. उपरोक्त १६५ ग्रामपंचायतीचे ग्रामसेवकांना स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम १९३० चे (सुधारणा अधिनियम २०११) नुसार दंड ठोठावून त्यांच्यावर शिस्तभंग विषयक कार्यवाही का करण्यात येऊ नये ? अशी नोटीस बजावण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परतूर (जि.जालना) ग्रामीण रुग्णालयाला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी दुरुस्त करण्याबाबत

**(२९) * २९२५४ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परतूर (जि.जालना) ग्रामीण रुग्णालयास असलेला पाणीपुरवठा गेल्या एक महिन्यापासून बंद असल्याने रुग्ण, त्यांचे नातेवाईक व कर्मचाऱ्यांची गैरसोय होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयातील जलवाहिनी नादुरुस्त झाल्याने पाणीपुरवठा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर जलवाहिनी दुरुस्त करण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, परतूर, जि.जालना येथील पाणीपुरवठा जलवाहिनी माहे फेब्रुवारी, २०१७ दरम्यान नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आले. सदर ग्रामीण रुग्णालय, परतूर येथील जलवाहिनी वारंवार नादुरुस्त होत आहे. त्याबाबत मुख्याधिकारी, नगरपरिषद परतूर यांचेकडे वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आलेला आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी रुग्णालयातील पाणीपुरवठा खंडीत झाल्यानंतर रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून रुग्णालयाच्या आवारातील बोअरवेल मधून रुग्णांना पाणीपुरवठा केला जातो. तसेच ज्यावेळेस बोअरवेलच्या पाण्याचा पुरवठा रुग्णांना केला जातो त्यावेळेस पाण्याचे नमुने जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा जालना यांचेकडून पाण्याची तपासणी करुन घेवून रुग्णांना शुध्दपाणी पुरवठा होईल याची दक्षता घेतली जाते.
(३) मुख्याधिकारी, नगरपरिषद परतूर यांना वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय परतूर यांनी त्यांच्याकडे वेळोवेळी पत्र व्यवहार करुन पाठपुरावा केलेला आहे. सद्य:स्थित नगरपरिषद परतूर यांचेकडून जलवाहिनी दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे व पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### नवीन पारगांव (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील दंत महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या प्रवेशप्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(३०) * ३०५९५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवीन पारगांव (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील तात्यासाहेब कोरे दंत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मेरीटप्रमाणे प्रवेश न देता नियमबाहयपणे त्यांच्याकडून पैसे घेऊन प्रवेश देणे, पाच वर्षापासून प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी प्राचार्याच्या मनमानी कारभारामुळे त्रस्त झाल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) तसेच उपरोक्त महाविद्यालयाच्या प्राध्यापिका व विभाग प्रमुख डॉ.प्रिती बसगौडा पाटील यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडे सदर महाविद्यालयाची तक्रार केली होती, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी तक्रारीची दखल घेवून महाविद्यालयाशी संपर्क साधून थकबाकीची रक्कम देण्याबाबतचा अहवाल महाविद्यालयास दिला होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर विद्यापीठ नाशिक यांच्या अहवालाच्या अनुषंगाने डॉ.प्रिती पाटील यांनी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री, सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडे याबाबतचे निवेदन दिनांक ३० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर निवेदनाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार महाविद्यालयाच्या प्राचार्यावर कोणती कारवाई केली तसेच दंत महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ.पाटील यांना सेवेत घेणे व थकीत रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे. प्राचार्यांच्या मनमानी कारभाराबाबत डॉ.प्रिती पाटील यांचे निवेदन आणि कमी वेतनासंदर्भात श्री.सुरेश चौहान या कर्मचाऱ्याने दाखल केलेली तक्रार विद्यापीठास प्राप्त झाली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) दिनांक ३०/०१/२०१७ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने विद्यापीठाने दिनांक २२/०२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये डॉ.प्रिती पाटील यांना महाविद्यालयाविरुध्द सेवाविषयक बाबींबाबत त्यांचे गाऱ्हाणे असल्यास, विद्यापीठ निदेश क्र.०५/२०१२ मध्ये विहीत केलेल्या तरतुदीनुसार गाऱ्हाणी अपिल दाखल करण्याबाबत कळविले आहे. तसेच, दिनांक ०७/०३/२०१७ रोजीच्या पत्रान्वये डॉ.प्रिती पाटील यांना विद्यापीठाच्या दिनांक २१/०५/२०१४ रोजीच्या निर्णयाप्रमाणे सेवेत रुजू करुन घेतले आहे किंवा कसे व वेतनाच्या थकबाकीची रक्कम अदा केली आहे किंवा कसे, याबाबत महाविद्यालयाकडून सविस्तर खुलाश्याची मागणी करण्यात आलेली आहे.

-----------------

## राज्यातील अवर्षणग्रस्त जिल्हयातील पाणीटंचाई दूर होण्यासाठी सिंचन प्रकल्पांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(३१) * २७७६३ डॉ.अपूर्व हिरे, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक २५५९६ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रखडलेल्या ३७६ सिंचन प्रकल्पांची बांधकामाधीन दिनांक १ एप्रिल, २०१६ रोजीची संभाव्य उर्वरित किंमत (नविन भूसंपादन कायद्यानुसार भूसंपादनाच्या वाढीव किंमतीसह) सुमारे रुपये ८४,४३०/- कोटी इतकी आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हे व कायम दुष्काळग्रस्त भागातील प्रलंबित सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सुमारे १० हजार ६८७ कोटी रुपयांची आवश्यकता असून केंद्र शासनाकडे दहा हजार कोटी रुपयांच्या पॅकेजची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त पॅकेजनुसार विदर्भ, मराठवाडयातील आत्महत्याग्रस्त जिल्हे व अन्य दुष्काळ अवर्षण पिडीत जिल्ह्यांमधील प्रतिवर्षी उद्भवणारी पाणीटंचाई व दुष्काळाच्या पार्श्वभुमीवर राज्यातील सदर बांधकामाधीन प्रकल्पांची सद्यस्थिती काय आहे,

(४) असल्यास, सदर बांधकामाधीन सिंचन प्रकल्प पुर्ण करण्याकरिता निधी उपलब्ध करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर बांधकामाधीन प्रकल्पाची कामे राज्य शासनाच्या निधीतून पूर्णत्वाच्या वेगवेगळया टप्प्यावर चालू आहेत.

(४) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समाविष्ट २६ प्रकल्पांना सन २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीसाठी रुपये ३८३० कोटीचे केंद्रीय अर्थसहाय्य व रुपये १२७७३ कोटीचे दिर्घकालीन नाबार्डच्या कर्जास मंजूरी प्राप्त करुन घेतली आहे.

सन २०१६-१७ मध्ये आतापर्यंत रुपये ३५९ कोटीचे केंद्रीय अर्थसहाय्य व रुपये १२२७ कोटीचे कर्जाची रक्कम प्राप्त झाली आहे.

याव्यतिरिक्त केंद्र शासनास आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील व अवर्षणप्रवण जिल्ह्यातील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रुपये १०,६८७ कोटी निधी मिळणेबाबत विनंती करण्यात आली आहे. याबाबत पाठपुरावा सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील वैद्‌यकीय महाविद्‌यालयाने शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना वैद्‌यकीय चाचणीकरिता पैसे भरावयास सांगितल्याबाबत**

**(३२) * २९३५६ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना कोणत्याही शासकीय रुग्णालयात उपलब्ध असलेली चाचणी मोफत करण्याची सोय असूनही नागपूर येथील वैद्‌यकीय महाविद्‌यालयाने सदर अधिकारी व कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना चाचणी/उपचार करावयाची असल्यास चाचणीकरीता आधी पैसे भरुन नंतर भरलेल्या पैसाचे देयक आप-आपल्या कार्यालयात जावून वैद्‌यकीय देयक सादर करण्यास सांगितल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाबाबत विदर्भ वैद्‌यकीय महाविद्‌यालय व आरोग्य सेवा कर्मचारी संघटना (इंटक) या संघटनांनी विरोध केला असून कर्मचारी यांनी अधिष्ठात्यांसह मा.वैद्‌यकीय शिक्षण मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) असे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी ज्या चाचण्यांसाठी शासनाचे वेगळे निर्देश नाहीत अशा चाचण्या नि:शुल्क करण्याबाबत अधिष्ठाता, शासकीय वैद्‌यकीय महाविद्‌यालय व रुग्णालय, नागपूर यांनी परिपत्रक निर्गमित केले आहे. तसेच, प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन, आवश्यक कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत संचालक, वैद्‌यकीय शिक्षण व संशोधन यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे रूग्णाचा मृत्यू झाल्याबाबत**

**(३३) * २७३४६ प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे वार्ड क्र. २३ मध्ये उपचारासाठी भरती करण्यात आलेल्या रुग्णाचा ऑक्सिजन न लावल्याने व डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित दोषी डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) यासंदर्भात रुग्णाच्या नातेवाईकांनी डॉक्टरांच्या हलगर्जीपणाबाबत रुग्णालय प्रशासनाकडे कोणतीही तक्रार केली नाही. सबब, चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील मजुरांना रोजगार हमी योजनेची कामे मिळण्याबाबत**

**(३४) * ३०६०१ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील १९ ग्रामपंचायतीमधील दुर्गम आदिवासी भागातील ५२७९ मजुरांनी दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास कामाची मागणी करुनही रोजगार हमी योजनेची कामे न मिळाल्याने बेरोजगार मजुरांनी तसेच श्रमजीवी संघटनेचे कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी बेरोजगार भत्त्यासाठी तहसिल व पंचायत समिती, जव्हार यांच्या कार्यालयावर दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढून ठिय्या आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन रोजगार हमी योजनेची कामे नियमित सुरू करण्याबाबत व बेरोजगारांना भत्ता मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.

(२) श्रमजीवी संघटनेने १९ ग्रामपंचायतीमधील ५,२७९ मजूरांची यादी करुन मगांराग्रारोहयो कामाची मागणी केली होती. त्यानुषंगाने संबंधित यंत्रणांना कामे पुरविण्याबाबत तहसिलदार जव्हार यांच्याकडून कळविण्यात आले होते, त्यानुसार सदर ग्रामपंचायतीमध्ये कामे सुरु करुन मजुरांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तथापि मागणीप्रमाणे सलग रोजगार न पुरविल्याने ज्या कालावधीत काम उपलब्ध करुन दिले नाही त्या कालावधीतील बेरोजगार भत्ता देण्यासंदर्भात बेरोजगार भत्ता नियम, २०१२ मधील तरतूदीनुसार मजूर बेरोजगार भत्ता मिळण्यास पात्र आहेत किंवा कसे तसेच अनुषंगिक मुद्दयांच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### नर्मदा खोऱ्यात उपलब्ध असणाऱ्या पाण्यावर महाराष्ट्राने गुजरातच्या मागणीनंतर हक्क सोडण्याबाबत

**(३५) * २७९६६ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक १९३५३ ला दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नर्मदा जल लवादाच्या अंतिम निर्णयानुसार मंजूर असलेले व नर्मदा खोऱ्यात उपलब्ध असणाऱ्या ११ टी.एम.सी पाण्यापैकी ५ टी.एम.सी पाण्यावर महाराष्ट्राने गुजरातच्या मागणीनंतर हक्क सोडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तापी सिंचन पाटबंधारे महामंडळाने या कराराला विरोध केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नंदुरबार जिल्ह्यातील सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन क्षेत्रात सदर ११ टी.एम.सी पाणी वापरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

नर्मदा पाणी तंटा लवादानुसार महाराष्ट्र राज्याच्या वाट्यास नर्मदा खोऱ्यातील १०.८९ अघफु पाण्यापैकी गुजरात राज्यातील तापी नदीवरील उकई जलाशयातून महाराष्ट्रास ५ अघफू पाणी मिळण्यासाठी गुजरात व महाराष्ट्र शासनात दिनांक ७/१/२०१५ रोजी सामंजस्य करार झाला आहे. त्यामुळे नर्मदा खो-यातील सरदार सरोवर जलाशयातून उर्वरित ५.८९ अघफु पाणी उपलब्धता होणार आहे.

(२) नाही.

(३) उकई धरणातून ५ अघफू पाणी वापराच्या योजनेचा पुर्व संभाव्यता अहवाल (Pre feasibility report) तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इसवली-पनोरे (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील ग्रुप ग्रामपंचायतींतर्गत येणा-या इसवली गावातील रस्त्याची व गटाराची दुरुस्ती करण्याबाबत

**(३६) * ३०८१४ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इसवली-पनोरे (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील ग्रुप ग्रामपंचायतींतर्गत येणा-या इसवली गावातील सुतारवाडी-रेवटेवाडी (येगिरावड) ते नवलादेवी मंदिर रस्त्यांचे गटारासह खडीकरण व डांबरीकरण करण्याची मागणी स्थानिक गेल्या अनेक वर्षापासून करीत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त विकास कामे करण्याबाबत मा.गृहनिर्माण मंत्री यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांना लेखी पत्राद्वारे विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.गृहनिर्माण मंत्री यांनी विनंती केल्यानंतरही उक्त विकास कामे अपूर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने विकास कामे पूर्ण करण्यास विलंब करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करणे, तसेच सदर रस्त्याचे गटारासह खडीकरण व डांबरीकरणाचे कामास निधी उपलब्ध करुन काम पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) स्थानिक नागरिकांच्या मागणीचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, मा.लोकप्रतिनीधी यांनी मागणी केली होती.

(२) अशा स्वरुपाची मागणी प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार प्रश्नांकित रस्त्याचे नाव इसवली सुतारवाडी प्राथमिक शाळा ते रेवटेवाडी प्रजिमा ६३ ला जोडणारा रस्ता असून सदर रस्ता ग्रामीण मार्ग क्र.११२ दर्जाचा आहे. रस्त्याची एकूण लांबी ३.५०० कि.मी. असून सदर रस्त्याच्या ०.६०० कि.मी. लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम सन २०१२- २०१३ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. तसेच सन २०१५-१६ मध्ये डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत या रस्त्याचे खडीकरण करण्याचे १.०० लक्षचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

जिल्हा परिषदेला विविध योजनेंतर्गत प्राप्त होणा-या निधीमधून कामाची निकड व प्राथम्यक्रमानुसार रस्त्यांची कामे हाती घेतली जात असल्याने अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

प्रश्नांकित रस्त्याच्या उर्वरीत खराब लांबीतील दुरुस्तीचे काम रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत उपलब्ध निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथी उपचार करण्यास अनुमती देण्याबाबत**

**(३७) * ३०५९६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात होमिओपॅथी शिक्षित डॉक्टरांना ॲलोपॅथीबाबत एक वर्षाचा वैद्यकीय शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण केल्यास ॲलोपॅथी उपचार करण्यास अनुमती देण्यात येईल असा निर्णय दोन वर्षापूर्वी शासनाने जाहिर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाची अद्यापपर्यत अंमलबजावणी झाली नसल्याने होमिओपॅथी शिक्षित विद्यार्थ्यामध्ये नैराश्याचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार होमिओपॅथी शिक्षित विद्यार्थ्यांना ॲलोपॅथी उपचार पध्दतीसाठी एका वर्षाच्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एमएचसी २०१४/प्र.क्र.३०८/१४/शिक्षण-२, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ अन्वये राज्यातील नोंदणीकृत होमिओपॅथी वैद्यक व्यावसायिकांना राज्यात आधुनिक वैद्यक शास्त्रामध्ये वैद्यक व्यवसाय करण्याकरिता आधुनिक औषधशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर निर्णयाची अंमलबजावणी झाली असून महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, यांचेमार्फत पहिल्या बॅचसाठी प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली असून सन २०१६-१७ पासून अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे. आधुनिक औषधशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून १४ शासकीय महाविद्यालयात सुरु करण्यात आलेला आहे. सदर अभ्यासक्रमासाठी ६१५ इतक्या नोंदणीकृत होमिओपॅथी वैद्यक व्यावसायिकांनी प्रवेश घेतला असून सदर महाविद्यालयात त्यांचे शिक्षण दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ पासून सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.